**आदेश**

क्र.कावि/कक्ष७:२/प्रअभूसं/न.क्र.१०२/कावि-/3033/१९
जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा
दिनांक- ०६/ ११ / २०१९

विषय :- भूसंपादन प्रकरण क्रमांक १६/२००८-०९ मौज भोटा (बुडीत क्षेत्र) ता.नांदुरा जि.बुलडाणा मध्ये प्रारुप निवाडयास ६ महिन्याची मुदतवाढ मिळणेबाबत.

संदर्भ:- विशेष भूसंपादन अधिकारी कं.क्र.३ जिगांव प्रकल्प जि.का.बुलडाणा यांचे पत्र क्र. कावि/अका/कं.क्र.३ /३४४/२०१९ दिनांक ३०-१०-२०१९.

*****

ज्या अर्थी विशेष भूसंपादन अधिकारी कं.क्र.३ जिगांव प्रकल्प जि.का.बुलडाणा यांनी भूसंपादन प्रकरण क्रमांक १६/२००८-०९ मौज भोटा (बुडीत क्षेत्र) ता.नांदुरा जि.बुलडाणा मध्ये प्रारुप निवाडयास ६ महिन्याची मुदतवाढ मिळणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे.

सदर प्रकरणात या कार्यालयाचे आदेश दिनांक २२-११-२०१८ नुसार कलम १९ ला मंजुरात दिली आहे त्यानुसार प्रकरणात दिनांक २१-११-२०१९ पर्यंत निवाडयाची कार्यवाही हाणे आवश्यक आहे.

सदर प्रकरणात कार्यकारी अभियंता जिगांव प्रकल्प पुनर्वसन विभाग खामगांव यांचे पत्र दि. १८-०९-२०१९ नुसार प्रकरणातील मालमत्तेची अंदाजपत्रके तयार करण्यात आली असून ती मान्यतेसाठी वरिष्ट कार्यालयाकडुन मंजूर करण्यासाठी व निधी प्राप्त करण्यासाठी निवाडयासाठी मुदतवाढ घेण्याची विनंती केली आहे.

विशेष भूसंपादन अधिकारी कंत्राटी- ३ जि.का.बुलडाणा यांनी यंत्रणेकडुन शेतीवरील मालमत मुल्यांकन प्राप्त करणे व तद्नंतर भूसंपादन अधिकारी यांचे स्तरावरील कार्यवाहीसाठी ६ महिन्याचा कालावधी लागु शकतो त्यामुळे यंत्रणेने विनंती केल्यानुसार व आवश्यकता असल्याने प्रकरणात दिनांक २१-११-२०१९ च्या पुढे निवाडयाकरीता मुदतवाढ मिळण्याबाबत विनंती केली आहे.

ज्याअर्थी भूसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम २५ मध्ये जिल्हाधिकारी,कलम १९ अन्वये घोषणा प्रसिध्द केल्याच्या तारखेपासून बारा महिन्याच्या कालावधीत निवाडा देईल आणि जर त्या कालावधीत निवाडा देण्यात आला नाही तर जमीन संपादनाची संपूर्ण कार्यवाही रद्द होईल.

परंतु,त्याचे समर्थन करणारी परिस्थिती अस्तित्वात असेल तर, समुचित शासनाला बारा महिन्यांच्या कालावधीत वाढ करण्याचा अधिकार असेल.

परंतु आणखी असे की, कालावधी वाढविण्याचा असा कोणताही निर्णय,लेखी स्वरुपात नोंदविण्यात येईल आणि तो अधिसूचित करण्यात येईल आणि संबंधित प्राधिकरणाच्या वेबसाईटवर टाकण्यात येईल.अशी तरतूद आहे.

तरी भूमि संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम २०१३ चे नियम २५ नुसार भुसंपादन प्रकरण क्रमांक १६/२००८-०९ मौज भोटा (बुडीत क्षेत्र) ता.नांदुरा जि.बुलडाणा या प्रकरणात प्रारुपनिवाडा करण्यास ०६ (सहा)महिन्याची मुदतवाढ देण्यांत येत आहे.

(डॉ.निरुपमा डांगे)
जिल्हाधिकारी बुलडाणा